क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ३४७ दिनांक ०५/०८/ २०११

विषय : मुत्रपिंडरोपण शस्त्रक्रियेनंतरच्या उपचार कालावधीकरिता ३ (तीन) महिन्यापर्यंत विशेष रजा मंजूरीबाबत.

संदर्भ : सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३

.....

सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील तरतुदीनुसार तदर्थ म.रा.वि.मंडळ/महावितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांनी मुत्रपिंड प्रतिरोपणाची (Kidney Transplantation) शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांना आलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर शस्त्रक्रिया कराव्या लागणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष रजा मंजूर करण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता सामान्य आदेश क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ ला संलग्न सुधारपत्र क्र.५६ दि.१९.०५.१९९० अन्वये दिलेल्या अधिकारानुसार वितरण कंपनीचे वैद्यकीय सल्लागार, कार्यकारी संचालक (मा.सं.), संचालक (प्रकल्प), संचालक (संचालन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून व्यवस्थापकीय संचालक यांनी वितरण कंपनीतील अधिकारी/कर्मचारी यांचेवर मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation) करण्यात आल्यास त्यांना खालीलप्रमाणे विशेष रजा देण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

१) *मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया (Kidney Transplantation) करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याला त्यांच्या खात्यावर शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील सर्व रजा उपभोगून झाल्यानंतर तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असल्याबाबत शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यास त्याला जास्तीत जास्त तीन महिनेपर्यंत सरासरी वेतनावरील विशेष रजा मंजूर करण्यात येईल.*

२) *कर्मचाऱ्याच्या खात्यावरील शिल्लक असलेली सरासरी वेतनावरील रजा संपेल त्या तारखेपासून सदर विशेष रजेची गणना करण्यात यावी.*

३) *सदर विशेष रजा संपल्यानंतर तो बरा होण्यासाठी त्याला आणखी रजेची आवश्यकता असल्यास त्याचे खात्यावर रजा शिल्लक असल्यास अर्धसरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यात यावी.*

४) *अर्धसरासरी वेतनावरील रजा संपल्यानंतर अशा कर्मचाऱ्याची नोकरी पुढे चालू राहावी यासाठी त्याच्या शारिरीक पात्रतेची तपासणी करण्यासाठी त्याला जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे पाठविण्यात यावे आणि त्याने तसा निर्देश दिल्यास कर्मचाऱ्याला असाधारण बिनपगारी रजा मंजूर करण्यात यावी.*

*५) म.रा.वि.वि.कं.मर्या. कर्मचारी सेवाविनियमातील अनुसूची-९ मधील तरतुदीनुसार सरासरी वेतनावरील रजा मंजूर करण्यास सक्षम असलेले अधिकारी सदर विशेष रजा मंजूर करण्यास सक्षम असतील.*

*६) सदर विशेष रजेची सवलत कर्मचाऱ्याचे सेवाकाळात फक्त एकदाच अनुज्ञेय राहील.*

३. सदर प्रशासकीय परिपत्रक १ मार्च २०११ पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

***(विजय भि. बागुल)***
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

D:\O&M\Hospitals\Adm.Cir.-Kidney Operation Leave.doc
26/07/11